www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३८ वार सानिवार दि. ०१ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# होरायझन अॅकाडमी निफाड मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित होरायझन अकाडमी निफाड मध्ये एक दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांच्या नृत्य आविष्काराने प्रेक्षकांची मने जिंकली. व्यासपीठावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या जुन्या काळातील गाणी प्रेक्षकांना पुन्हा ७५ च्या दशकात घेऊन गेली. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे सभापती श्री बाळासाहेब क्षिरसागर, उपाध्यक्ष श्री विश्वास मोरे, संस्थेचे चिटणीस श्री दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी नाना गडाख, संस्थेच्या महिला प्रतिनिधी सौ शोभाताई बच्छाव, निफाड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश गुरव, शालेय समिती अध्यक्षा सौ मंजिरी ताई कुंन्दे, सदस्य संदिप कापसे, अजय गोळे, वैभव पानगव्हाणे, अड समिर भोसले, अड श्रीकांत रायते, शिरीष वडघुले, खंडू बोडके यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शालेय संगीत मंचाने नृत्य देवता नटराजाची नटरंग या प्रसिद्ध चित्रपटातील गिताने अभिवादन केले या वेळी ८० च्या दशकातील सुप्रसिद्ध चित्रपटातील गाणी विद्यार्थ्यांनी सादर केली तसेच शोले या चित्रपटातील प्रसिद्ध अशा गब्बर सिंग च्या व्यक्ती रेखेवर आधारित नाटक विद्यार्थ्यांनी सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. जुन्या काळातील प्रसिद्ध अशा गाण्यानी प्रेक्षकांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शालेय मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी वार्षिक अहवाल सादर करताना वर्ष भरातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल माहिती दिली तर कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सभापती श्री बाळासाहेब क्षिरसागर यांनी भविष्यातील संस्थेच्या योजनांची माहिती दिली यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर शालेय शिक्षक प्रविण काळे सर यांनी आभारप्रदर्शन करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# CM फडणवीस-DCM शिंदेंच्या अटकेचा कट?

## मविआ काळातील घटनाक्रम; महायुतीकडून SIT स्थापन!

महाविकास आघाडीचे सरकार असताना अनेक मुद्द्यांवरून त्या सरकारला आणि पर्यायाने तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लक्ष्य करण्यात आले होते. १०० कोटींची वसुली, मुकेश अंबानींच्या घराबाहेर ठेवलेली स्फोटके, मनसुख हिरेन हत्या प्रकरण, पालघर साधू हत्या प्रकरण अशा अनेक प्रकरणांवरून मविआ सरकारवर हल्लाबोल करण्यात आला होता. यातच राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्याचा कट रचण्यात आला होता, असा मोठा आरोप करण्यात आला होता. यासंदर्भात आता विद्यमान महायुती सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर महाविकास आघाडीचे सरकार असताना खोटे गुन्हे दाखल करून अडकविण्याचा कट रचल्याचे षडयंत्र आखले गेले होते, असा आरोप करत, या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी भाजपा आमदार प्रवीण दरेकर यांनी नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात केली होती. आता या मागणीच्या आधारावर



महायुती सरकारने सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन केली आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

**महायुतीकडून विशेष तपास पथकाची स्थापना**

महायुती सरकारने यासंबंधीचा शासन निर्णय ३१ जानेवारी रोजी काढला आहे. कायदा व सुव्यवस्थेचे पोलीस सह आयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक या प्रकरणाची चौकशी करेल. या विशेष तपास पथकात राजीव जैन (पोलीस उपमहानिरीक्षक, एसआरपीएफ, मुंबई), नवनाथ ढवळे (पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६ मुंबई) आणि आदिकराव पोळ (सहायक पोलीस आयुक्त – मुंबई शहर) या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तपास पथकाला अहवाल सादर करण्यासाठी ३० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात एक पेन ड्राइव्ह सादर केला होता. या पेन ड्राइव्हमध्ये सदर षडयंत्राचे स्टिंग ऑपरेशन असल्याचा दावा त्यांनी केला होता. संजय पांडे नावाच्या अधिकाऱ्याने डीसीपी लक्ष्मीकांत पाटील यांना देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अडकवण्याचा प्लॅन करा, असे आदेश दिले होते. तसेच संजय पुनामिया यांनी शेखर जगताप, एसीपी सरदार पाटील आणि काही लोकांविरोधात तक्रार केली होती. तो एसीपी सांगतो, मला भीती वाटते, गुन्हा होऊ शकत नाही मग कसे अडकवता येईल. तरीही डीसीपी पाटील हे पांडेंचे आदेश आहेत, आपल्याला करावे लागते. कुठल्याही परिस्थितीत देवेंद्र फडणवीसांना अडकवता येईल, त्यादृष्टीने कारवाई करा, असे व्हिडिओ समोर आले होते. या संभाषणाचे व्हिडिओ प्रवीण दरेकरांनी पेन ड्राईव्हद्वारे आणले होते. पेन ड्राईव्ह सादर केल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी व्हावी, अशी मागणी केली. सभागृहात कॅबिनेट मंत्री शंभूराज देसाई यांनी सरकारतर्फे उत्तर देताना एसआयटी स्थापन केली जाईल, असे सांगितले होते.

**प्रवीण दरेकर यांची ही मागणी मान्य करण्यात आली**

देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यात अडकवा, अशी एक कथित ऑडिओ क्लिप सभागृहात सादर करण्यात आली होती. यात एसीपी सरदार पाटील एका अज्ञात व्यक्तीशी बोलत असून त्यात ते परमबीर सिंह आणि संजय पुनामिया यांच्यार गुन्हा दाखल करून फडणवीस-शिंदे यांना अडकवण्याचे षड्यंत्र रचत असल्याचे समोर आले होते. या प्रकरणानंतर प्रवीण दरेकर यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी चौकशी नेमावी, अशी मागणी केली होती. आता प्रवीण दरेकर यांची ही मागणी मान्य करण्यात आली आहे. दरम्यान, विशेष म्हणजे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनीही अशाच प्रकारचा आरोप मागे केला होता. शरद पवार यांचे निवासस्थान असलेल्या सिल्वर ओकवर बैठक पार पडली होती. या बैठकीला शरद पवार, अनिल देशमुख, अनिल गोटे आणि पी.पी. चव्हाण उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी माझ्यावर विरोधकांवर खोटी कारवाई करण्यासंदर्भात दबाव आणला. मात्र, मी त्यांना नकार दिला. मी अशाप्रकारे कुणावरही खोटा गुन्हा दाखल करणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले, असे परमबीर सिंह यांनी म्हटले होते.

# पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असणाऱ्या जितेंद्र म्हात्रेंना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर!

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये कर्तव्यावर असणाऱ्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र विठ्ठल म्हात्रे यांना राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. नवी मुंबई पोलीस दलामध्ये प्रचंड दबदबा असणारे अंमलदार म्हणून म्हात्रे यांची ओळख आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांना पदक जाहीर करण्यात आले.

रायगड पोलीस दलात जितेंद्र म्हात्रे भरती झाले. माणगाव खालापूर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगड अलिबाग, तसेच पोलीस मुख्यालय व त्यानंतर 2007 पासून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात गुन्हे शाखा , पनवेल तालुका पोलीस खारघर त्यानंतर लागलीच पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये त्यांची बदली झाली. सध्या तेथेच ते कर्तव्यावर आहेत. दरोडेखोर भिकू वाघमारेचा त्यांनी सामना करून अटक केल्याची पोलीस दप्तरी नोंद आहे. वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये गुन्हेगारांना पकडण्यासाठी त्यांनी अंमलदार म्हणून संबंधित अधिकाऱ्यांची साथ केली. म्हात्रे यांना पोलीस दलातून रिवार्ड सुद्धा मिळालेले आहेत. त्यांना भारतीय 76 व्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर करण्यात आलेले आहे.



# वारदोली येथील हळदीकुंकू समारंभ महिला सक्षमीकरणच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमाने संपन्न.

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी. भोईर

गुरुवार दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारदोली पनवेल येथे निपुण माता पालक गटांकरिता 'हळदीकुंकू समारंभ' ठेवण्यात आला.या समारंभाला एका आगळ्यावेगळ्या समारंभाचे रूप देण्यात आले. सदर समारंभ फक्त हळदी कुंकू उपक्रम महिलांच्या मनोरंजना पर्यंतच मर्यादित नव्हता. तर सदर उपक्रमाला महिलांच्या सक्षमीकरणाकरिता कार्य करणाऱ्या आदर्श अशा महिलांचे मार्गदर्शन लाभले होते. हे मार्गदर्शन मातांकरिता त्यांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाकरता ही उपयुक्त ठरणारे असे मार्गदर्शन होते. सदर कार्यक्रम जिल्हा परिषद वारदोली शाळेत घेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात आलेल्या मान्यवरांच्या शुभ हस्ते दीपक प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करून करण्यात आले. त्याचबरोबर आलेल्या मान्यवरांचे



स्वागत आणि निपुण माता गटांचे स्वागतही करण्यात आले. नंतर मान्यवरांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनामध्ये. आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी दैनंदिन जीवनात मुलांसोबत कसा संवाद साधावा, महिलांनी आपले आरोग्य कशाप्रकारे ठेवलं पाहिजे त्याचबरोबर विशेष म्हणजे आपल्या महिलांच्या शारीरिक आरोग्या बरोबरच मानसिक आरोग्य, मानसिक आजार, यावर चांगल्या प्रकारे मार्गदर्शनपर संवाद साधला. तसेच सदर कार्यक्रमात महिलांच्या मनोरंजनाकरिता काही खेळ ही घेण्यात आले. आणि खेळात विजेत्या मातांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस ही वितरित करण्यात आले. हळदी कुंकू या समारंभाकरिता कार्यक्रमाला लाभलेल्या उत्कृष्ट अशा महिलांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रमुख पाहुण्यांमध्ये मान.प्रीती ताई म्हात्रे जॉर्ज मॅडम महाराष्ट्र राज्य महिला मध्यवर्ती समिती सदस्य व माजी नगरसेविका पनवेल महानगरपालिका, अनिशा कोल्हापुरे सायकॉलॉजीस्ट, रंजना केणी केंद्रप्रमुख केंद्र नेरे, संजय केणी केंद्रप्रमुख पोयंजे,जानवी बताले माजी उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत वारदोली, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आशा भोपी,वर्षा म्हात्रे,धनश्री पाटील,प्रगती पाटील,लीडर माता, महिला पालक , शिक्षणप्रेमी, त्याचबरोबर सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारदोली येथील मुख्याध्यापिका अरुणा सूर्यवंशी आणि उपशिक्षिका ज्योती भोपी तसेच शाळा व्यवस्थापन समिती,शाळेतील सतत उत्स्फूर्त सहभागी असणारे विद्यार्थी, गावातील शिक्षण प्रेमी, या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाची सांगता शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा सूर्यवंशी मॅडम यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त करून करण्यात आली. त्याचबरोबर सदर हळदी कुंकू या कार्यक्रमाला एक आगळे वेगळे रूप दिल्याबद्दल गावकरी आणि शिक्षणप्रेमी, गावातील निपुण मातांनी शाळेचेही आभार व्यक्त करत. मोठ्या आनंदात आणि उत्साहात हळदीकुंकू कार्यक्रमाची सांगता झाली.

# मराठा समाजाचे नेतृत्व विनोद साबळे यांनी केला शिवसेनेत प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

मराठा समाजाचे नेतृत्व विनोद साबळे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे व तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे यांच्या सहकार्याने विनोद साबळे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी त्यांच्या समवेत मारुती पाटील, कमळाकर लबडे, मिरेंद्र शहारे, शुभम धारेराव, ज्वालासिंह देशमुख, सचिन कदम, दिनेश धामणसकर, प्रल्हाद कुंभार, किरण लबडे, सुहास थोरात, रमेश राठोड, रघुनाथ झुमरे, किरण साबळे, मयुर साबळे, अमोल साबळे, केतन निकम, ऋृषभ शेळके, निवृत्ती मालुसरे आदींनी पक्ष प्रवेश केला आहे.



# डिजिटल मीडिया परिषदेच्या लोणार तालुका अध्यक्षपदी संदीप भाऊ मापारी यांची निवड.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग**
**प्रमुखः-राजु शिंदे.**

**लोणार** : प्रत्येकांसाठी झटण्यासाठी आपले पाऊल पुढे ठेवणारी अर्थात पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेची बुलढाणा जिल्हा कार्यकारणी गठीत करण्यात आली आहे. या कार्यकारणीत बुलढाणा तालुकाध्यक्षपदी संदीप मापारी पाटील यांची निवड झाली आहे. डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनात तथा डिजिटल मीडिया परिषदेचे विभागीय सचिव जितुभाऊ कायस्थ यांच्या नेतृत्वाखाली मीडिया परिषदेने उर्वरित कार्यकारणी घोषित केली. यामध्ये, जिल्हा उपाध्यक्षपदी मेहकर येथील बाळू वानखेडे तर संघटक म्हणून चिखलीचे इस्तेखार खान यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. समाजाचा आरसा ठरलेल्या पत्रकारांचे जगणे स्थिर करण्यासाठी, इतकेच नाही तर त्यांच्या समस्येवर निराकरण करीत जगण्याची नवीन उमेद देण्यासाठी मराठी पत्रकार परिषद



अविरतपणे काम करीत आहे. राज्यात मराठी पत्रकार परिषदेचा विस्तार सर्व दूर होत असून, बुलढाणा जिल्ह्यातही संघटनेचा विस्तार जोमाने सुरू आहे. जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीत सिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाने तसेच डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल मीडियाची जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये, झी 24 तास या वृत्तवाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी मयूर निकम यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तर सचिव पदी नवराष्ट्र न्यूज चॅनलचे दीपक मोरे, उपाध्यक्षपदी ओटीटी मराठीचे किशोर खंदारे, घाटाखालील जिल्हाध्यक्ष म्हणून श्रीधर ढगे यांची नेमणूक करण्यात आली. तदनंतर, डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हा कार्य कारिणीने उर्वरित कार्यकारणी घोषित केली. यामध्ये, उपाध्यक्ष म्हणून बाळू वानखेडे, जिल्हा संघटक पदी इफेतखार खान, प्रसिद्धीप्रमुख अॅड. संदीप मेहत्रे, जिल्हा कोषाध्यक्ष म्हणून महत्त्वाची धुरा गणेश सवडतकर यांच्याकडे सोपविण्यात आली. समन्वयक पदी योगेश शर्मा, बुलढाणा तालुका अध्यक्षपदी प्रशांत खंडारे तर चिखली तालुकाध्यक्षपदी छोटू कांबळे, लोणार तालुका ध्यक्षपदी संदीप मापारी, सिंदखेड राजा तालुका ध्यक्षपदी राहुल झोटे तसेच देऊळगाव राजा तालुक्याचे अध्यक्ष म्हणून अशोक जोशी यांची निवड करण्यात आली आहे.

# भवानीनगर येथे गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिस्थापना

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालय भवानीनगर येथे गणेश मूर्तीची प्राण प्रतिस्थापना प्रा. रोहित भोईटे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.वैशाली भोईटे यांच्या शुभहस्ते शुक्रवारी महाविद्यालयाच्या वरील भागात करण्यात आली. यावर्षी महाविद्यालयाच्या वरच्या मजल्याचे काम पूर्ण झाले असून उदघाटन करतेवेळी संस्थेचे अध्यक्ष मा.प्रशांत दादा काटे यांच्या सुचनेवरून महाविद्यालयात गणपतीचे मंदिर असावं म्हणून सूचना करण्यात आली असता महाविद्यालयाचे प्राचार्या शिवाली माने देशमुख व कार्यालयीन अधीक्षक सुशील निंबाळकर यांनी अध्यक्ष प्रशांत दादा काटे यांच्या सूचनेचे पालन करून महाविद्यालयात गणपतीची मूर्ती आणून गणेश जयंतीच्या मुहूर्तावर गणपती मूर्तीची प्राण प्रतिस्थापना करण्यात आली.यावेळी महाविद्यालयातील सर्व



प्राध्यापक चव्हाण सर, वाघमोडे सर,लांडगे सर,जगताप मॅडम,होरणे मॅडम, निंबाळकर मॅडम,सूर्यवंशी मॅडम,केंगार मॅडम, काळभोर सर,दूरगुडे सर,थोरात मॅडम,वानखेडे मॅडम, चव्हाण मॅडम,रणसिंग मॅडम, इतर कर्मचारी गणेश क्षीरसागर,पूजा भोईटे,रविंद्र सुतार,वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.

# जि.प.शाळेस CCTV, साऊंड सिस्टिम व शैक्षणिक साहित्याचे वाटप... शाळेचा माजी विद्यार्थी विनोद बिरादार यांचा उपक्रम..

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूर अनंतपाळ**


: तालुक्यातील दैठणा येथील जिल्हा परिषद प्रशाळस दैठणा येथील युवा उद्योजक विनोद बिरादार पाटील यांच्या वतीने CCTV कॅमेरे तसेच साऊंड सिस्टीम व शैक्षणिक साहित्य माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी मंचावर काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, अँड.संभाजीराव पाटील, जेष्ठ नेते डी.एन. शेळके, माजी जि.प.अध्दक्ष पंडितराव धुमाळ, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, सभापती निळकंठ मिरकले, माजी कृषी सभापती गोविंद चिलकुरे, संचालक व्यंकटराव बिराजदार, आबासाहेब पाटील, व्यंकट हांद्राळे, बाजीराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते या वेळी विनायकराव पाटील यांनी बोलताना जिल्ह परिषद शाळा ही चांगली असावी ही फक्त शासनाचीच जबाबदारी आहे असं नसून गावकरी यांनी सुध्दा शाळेसाठी सहकार्य करणे ही काळाची गरज आहे असे मनोगत व्यक्त करून विनोद बिरादार पाटील यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळा ही चांगली व सुरक्षित असावी या साठी CCTV व इतर साहित्य दिले त्याबद्दल त्यांचे कौतुक केले या वेळी सरपंच, उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तसेच दैठणा गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वर्ग, समस्त गावकरी उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश मुळे यांनी तर सूत्रसंचालन शिक्षक विलास हासबे यांनी केले.



## लंडन (यू.के.) च्या ब्रेंट कौन्सिलचे मा.महापौर यांची लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाऊनच्या कार्यालयाला भेट

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )**

लंडन (यू.के.)च्या ब्रेंट कौन्सिलचे मा.महापौर श्री.भगवानजी चौहान यांनी मुंबई दौऱ्या दरम्यान लायन इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ च्या लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाऊनच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. यावेळी लायन्सचे आयपीडीजी मुंबईचे मा.शेरीफ,लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाऊनचे प्रेसिडेंट डॉ.जगन्नाथराव हेगडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.सदर भेट ही लायन्स क्लबच्या सामाजिक उपक्रमांवरील अभ्यासपूर्ण चर्चेसाठी घेण्यात आली.त्यामध्ये मधुमेह जागरूकता,दृष्टी काळजी कार्यक्रम आणि ग्रामीण भागातील विकासात्मक कामांना बळकट करण्यासाठी धोरणे,वंचित समुदायांमध्ये मधुमेह व्यवस्थापन आणि दृष्टी काळजी सुधारण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य देण्याच्या गरजेवर भर दिला.या बैठकीत सामाजिक आवाहानांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी सहकार्याचे महत्त्व आणि कृती करण्यायोग्य धोरणांवर प्रकाश टाकण्यात आला. याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ मिडटाऊनचे सेक्रेटरी व आयपीडीएस लायन विजय रायमाने,फर्स्ट व्हाईस प्रेसिडेंट लायन जितेंद्र दगडू सकपाळ, जय जवान क्रीडा मंडळाचे अध्यक्ष लायन दिलीप वरेकर आणि रेंज्यो आर्क व्हेंचर्सचे श्री. संजू सासमल व इतर पदाधिकारी या बैठकीला उपस्थितीत होते.




# भवानीनगर येथे एका युवकावर कोयत्याने हल्ला...

## वालचंदनगर पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीना घेतलं ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे शुक्रवारी दुपारी अकरा ते बारा वाजण्याच्या सुमारास भवानी माता मंदिर परिसरात दोन गटात जोरदार वाद होऊन निंबोडी गावातील सुजल जाधव या युवकावर कोयत्याने हल्ला करून जखमी करण्यात आला हा हल्ला भवानीनगर येथील शेख व अन्य तीन जणांनी केल्याची खबर वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे यांनी मिळाली या घटनेचे गांभीर्याने

> सणसर भवानीनगर परिसरात तयार होत असलेली कोयता गँग यांना चांगल्याप्रकारे आळा बसावा म्हणून सणसर गावचे सरपंच पार्थ निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट देऊन वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे यांची भेट घेऊन आपणास लागणारी सर्व मदत ग्रामपंचायत मार्फत भवानीमाता परिसरात लवकरच सीसीटीव्ही बसवून देण्यात येथील असे आश्वासन देण्यात आले.अश्या आरोपी यांना सोडू नये म्हणून विनंती करण्यात आली.
> **मा.पार्थ निंबाळकर**
> **सरपंच सणसर ग्रामपंचायत**

दखल घेत वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक राजुकमार डूणगे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पोलीस हवालदार गुलाबराव पाटील, हवालदार जाधव,हवालदार शैलेश स्वामी,हवालदार गणेश काटकर हवालदार कळसकर यांना योग्य तपासाच्या सूचना देऊन अवघ्या दोन तासात हल्ला करणारे आरोपी यांना अटक करण्यात आली. सदरची कामगिरी व उत्कृष्ट तपास लावल्याबद्दल पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीणचे पंकज देशमुख,अप्पर पोलीस अधीक्षक बारामती विभाग गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे वालचंदनगर पोलीस स्टेशनचे हवालदार गुलाबराव पाटील, हवालदार गणेश काटकर, हवालदार शैलेश स्वामी, हवालदार जाधव,भवानीनगर पोलीस स्टेशनचे हवालदार अजित थोरात,हवालदार मोहिते साहेब यांनी यशस्वी तपास करून आरोपीना अवघ्या दोन तासात अटक केल्याबद्दल भवानीनगर परिसरातुन पोलीस कर्मचारी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कौथिग भाग :16" चे आयोजन, शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



उत्तराखंड येथील रहिवासीयांच्या माध्यमातून देवभूमी स्पोर्ट्स फाउंडेशनच्या पुढाकाराने "कौथिग भाग:-16" चे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी शेकापचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली. यामध्ये उत्तराखंड मधील संस्कृती ,खाद्य संस्कृती, तेथील लोककला या महोत्सवाचे वैशिष्ट्य होते. सांस्कृतिक कार्यक्रमा सोबतच सामाजिक कार्यक्रमांमध्ये आरोग्य शिबिर, रोजगार शिबिर आणि इतरही बरेच काही या ठिकाणी आयोजकांकडून आयोजित करण्यात आले होते. आजही कामानिमित्त नवी मुंबईत आल्यावर सामाजिक बांधिलकीतून असे उपक्रम आपले इतर राज्यातील बांधव आपल्यासोबत एकरूप होऊन आयोजित करतात याचे समाधान वाटत असल्याचे शेकापचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले.

# देश के महापर्व पर देशनिष्ठा,कर्तव्य ओर अधिकार समजना महत्व पूर्ण.. डॉ.शिल्पा (पाठक) ठाकूर

## मनुवादी विचारधारा के लोग 400पार का नारा देने वाले ...सुदाम पाटील

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**



**पनवेल, दि.31 (वार्ताहर) :** देशाच्या 76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने खारघर सेक्टर 37 येथील इनामपुरी मैदानात पनवेल शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने ध्वजारोहण संपन्न झाला. संविधान म्हणजे स्वातंत्र्य, अधिकार, न्याय , समता, बंधुता अशा एक ना अनेक हक्क बहाल करताना प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने लोकशाहीतील महत्त्वपूर्ण लोकोत्सवा क्षणी संविधानिक मूल्यांची महानता जपत जिल्हाध्यक्ष पनवेल शहर काँग्रेस कमिटी सुदाम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे,माजी नगरसेविका शशिकला सिंग,जिल्हा सरचिटणीस डॉ.शिल्पा पाठक ठाकूर तसेच पक्षाचे पदाधिकारी राजेंद्र सिंह ,राकेश चव्हाण, लतीफ नालवंड तसेच मनोज बिरादार व जेष्ठ समाजसेवक गजानन पाटील अन्य पदाधिकारी , कार्यकर्ते स्थानिक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्र व देश भक्ती गीत सादर करून धर्मनिरपेक्षता, एकता अखंडतेचा संकल्प करून भारत माता की जय अश्या जोरदार घोषणा देण्यात आल्या. पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे यांनी सर्व महामानवांना अभिवादन करून त्यांनी केलेल्या त्या बलिदानातून हा राष्ट्र निर्माण झाला असल्याने त्या राष्ट्रासाठी आपण सर्वांनी आपले मतदान खूप विचार पूर्वक करून आपले अधिकार समजावे असे सांगितले.आयोजक डॉ .शिल्पा पाठक ठाकूर यांनी सार्वजनिक ठिकाणी सामूहिक पद्धतीने प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगून देशनिष्ठ बाबत सर्वांनी जागृत व्हावे व कर्तव्यनिष्ठ व्हावे असे आव्हान करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत ,सन्मान करून प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व भूखंड उपलब्ध केल्या बद्दल समाजसेवक गजानन पाटील व सहकार्यांच्या आभार मानले.

# महावितरणने केबल टाकण्यासाठी खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याची नागरिकांची मागणी



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: महावितरणने केबल टाकण्यासाठी खोदलेले नवीन पनवेल परिसरातील रस्ते पूर्ववत करण्याची मागणी येथील स्थानिक नागरिक करीत आहेत. नविन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील वर्दळीच्या ठिकाणी महावितरण केबल टाकण्यासाठी रस्त्यावर खोदकामे केली आहेत.केबल टाकण्याचे कामे पूर्ण झाली आहे .मात्र गेली 12 ते 15 दिवस झाले रस्त्यावर मातीचे ढिगारे व दगडी पडून असल्यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताचे प्रमाण या रस्त्यावर वाढत आहेत.तसेच मातीच्या धुळीमुळे नागरिक हैराण झाले आहे.या बाबत महापालिका अभियंता साळुंके यांना तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही.सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (ईज ऑफ लिव्हिंग) यासाठी मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या आदेशाला पनवेल महापालिका अधिकाऱ्यांकडून केराची टोपली दाखवली जात आहे? असा सवाल येथील रहिवाशांनी केला असून तत्परतेने खोदलेले रस्ते पूर्ववत करावेत अशी मागणी केली जात आहे.

# तलाठ्यांच्या बहिष्काराचा मुरबाडमधील विद्यार्थी आणि नागरिकांना फटका!

## उत्पन्न दाखल्यांअभावी शासकीय आणि शैक्षणिक कामे खोळंबली.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी. गौरव खरे.**
**मुरबाड**

मुरबाड तालुक्यात महसूल विभागातील तलाठ्यांच्या बहिष्कारामुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे. शैक्षणिक आणि शासकीय कामांसाठी अत्यावश्यक असलेल्या उत्पन्न दाखल्यांसाठी स्थानिक तलाठी पंचनामे करत नसल्याने अनेक विद्यार्थी आणि नागरिक अडचणीत आले आहेत.

**महसूल पंचनाम्याशिवाय दाखले अपुर्ण.**

शैक्षणिक सवलतींसाठी विद्यार्थ्यांना आणि विविध शासकीय योजनांसाठी नागरिकांना उत्पन्न दाखल्यांची आवश्यकता असते. हे दाखले महा ई-सेवा केंद्र किंवा सेतू केंद्रावर सादर करण्यापूर्वी तलाठी पंचनामे करणे आवश्यक असते. मात्र, मुरबाड




तालुक्यातील सर्व तलाठ्यांनी हे पंचनामे देण्यास गेले कित्येक दिवस बहिष्कार टाकल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे.

**शैक्षणिक आणि शासकीय कामांवर परिणाम**

तलाठ्यांच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे, तर शासकीय योजनांसाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांची कामे खोळंबली आहेत. वृद्ध नागरिक, निराधार महिला आणि अपंग बांधवांसाठी उत्पन्न दाखले मिळणे कठीण झाल्याने त्यांचा हक्क डावलला जात आहे.

**प्रशासनाचा प्रतिसाद**

या प्रकरणाबाबत मुरबाड महसूल विभागाच्या नायब तहसीलदार सुषमा बांगर यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांचे आणि नागरिकांचे नुकसान होत आहे, हे निश्चितच दुर्दैवी आहे. तलाठ्यांच्या संघटनेने ठाणे जिल्ह्यासह मुरबाडमध्ये दाखले पंचनामे न करण्याचा निर्णय घेतला आहे आणि याबाबत तहसीलदारांना पत्रही देण्यात आले आहे. मात्र, लवकरच यावर तोडगा काढला जाईल."

**तलाठी संघटनेचे मौन.**

या संदर्भात मुरबाड तलाठी संघटनेचे अध्यक्ष वाय. के. पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी, "मी १३ तारखेपासून रजेवर असल्याने मला याची माहिती नाही," असे सांगत अधिक बोलण्याचे टाळले.

**तलाठ्यांवर कारवाईची मागणी**

महसूल विभागाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून, नागरिकांच्या शासकीय कामांवरही परिणाम झाला आहे. त्यामुळे मुजोर तलाठ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संपूर्ण मुरबाडमधून होत आहे. प्रशासन लवकरच योग्य निर्णय घेईल का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# एकही झोपडपट्टीधारक बेघर होणार नाही; आम्ही तुमच्या पाठीशी ठामपणे

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी झोपडपट्टी वासियांना दिला दिलासा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

पनवेल एसटी बसस्थानक ते रेल्वे स्टेशन परिसरातील झोपडपट्टी परिसरात विकास आराखड्यामुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्टता दिली आणि झोपडपट्टी धारकांना दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध राहण्याचा सल्ला दिला. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्वेक्षण सुरू असल्यामुळे पुनर्वसन निश्चित होईल, आणि एकही झोपडपट्टीधारक बेघर होणार नाही, असे त्यांनी आश्वासित करून झोपडपट्टी वासियांना मोठा दिलासा दिला. विकास आराखडा आणि त्या अनुषंगाने शिवाजीनगर, मालधक्का, पंचशील नगर, नवनाथ नगर या झोपडपट्टी धारकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न समाजकंटकांकडून केला जात आहे. त्यामुळे येथील झोपडपट्टी धारकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन या विषयावर योग्य मार्ग काढण्याची मागणी केली. त्यानुसार हि बैठक मार्केट यार्ड येथे पार पडली. या बैठकीस पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक एडवोकेट मनोज भुजबळ, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशीला घरत, वृषाली वाघमारे, मछिंद्र झगडे, अशोक आंबेकर, सामाजिक कार्यकर्त्या जरीना शेख, रावसाहेब खरात, राहुल वाहुळकर, संजय जाधव, चंद्रकांत मंजुळे व्यासपीठावर उपस्थित होते. या बैठकीस झोपडपट्टी धारक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी बोलताना सांगितले कि, झोपडपट्टी धारकांनी दिशाभूल व फसवणूक करणाऱ्यांपासून सावध रहावे. पनवेल मधील शिवाजीनगर, मालधक्का, पंचशील नगर, नवनाथ नगर आदी झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून



होणार असून सर्व झोपडपट्टी धारकांना पक्के घरी देण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिकेत अंतर्गत येणाऱ्या या झोपडपट्टीचे पुनर्वसन सरकारच्या माध्यमातून करण्याची जबाबदारी पनवेल महानगरपालिकेची असून या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन साठी पंतप्रधान आवास योजने अंतर्गत सर्वेक्षणदेखील सुरु आहे. ज्या ज्या ठिकाणी पाठपुरावा करावा लागेल त्या ठिकाणी आम्ही पाठपुरावा करू असे सांगून कोणताही झोपड्पट्टीधारक बेघर होणार नाही याची काळजी घेऊ त्यांना परवडेल अशी घरे शासनाच्या नियमातून व माध्यमातून देण्याचे आश्वासन दिले. झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु असताना फॉर्म भरण्यासाठी काही लोकांकडून झोपडीधारकांकडून पैसे मागितले जात आहे, त्यामुळे गरीब माणसाकडून का पैसे घेता. असा सवालही त्यांनी उपस्थित करून झोपडपट्टीवासीयांची दिशाभूल करणाऱ्यांचा खरपूस समाचारही घेतला. झोपडपट्टी वासियांना चांगली आणि पक्की घरे मिळाली पाहिजेत हा आमचा कायम आग्रह राहिला आहे. आणि त्यानुसार तशी मागणी आणि पाठपुरावा आम्ही केला आहे. प्रत्येक झोपडपट्टी वासियाला घर मिळाले पाहिजे यासाठी पनवेल महापालिकेची जबाबदारी आहे. व्यापिठावरील भाजपचे आम्ही सर्व सक्षम आहोत आणि तशी जबाबदारी आम्ही घेतलेली आहे. असे सांगतानाच फसवणूक करणाऱ्यांपासून सावध रहा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी करत फसवणूक करणाऱ्याला आम्ही भाजपमध्ये घेणार नाही, असेही त्यांनी अधोरेखित केले. झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनासाठी पालिका आयुक्तांची भेट घेऊ, गरज भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन देत तुम्हाला सर्वाना न्याय भेटेल आणि जो पर्यंत पुनर्वसनाच्या बाबतीत न्याय मिळत नाही तो झोपड्पट्टीवासियांच्या एकाही घराला हात लावू देणार नाही, असा विश्वास देत भाजप तुमच्या पाठीशी काल होता आज आहे आणि उद्याही राहील, असे आश्वासित करत नागरिकांमधील संभ्रावस्था दूर केली. या बैठकीमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपच्या पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले.

# वैजापूर वकील संघाच्या उपाध्यक्षपदी ॲड.जावेद बेग



**दैनिक युवक आधार**
**वैजापूर प्रतिनिधी**

वैजापूर जिल्हा सत्र न्यायालय वकील संघाच्या उपाध्यक्ष पदासाठी दि .31 जानेवारी शुक्रवार रोजी झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत अड.जावेद बेग यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारा विरुद्ध पंधरा मतांचे मताधिक्य घेऊन दणदणीत विजय मिळवला. वैजापूर जिल्हा सत्र न्यायालय वकील संघाच्या अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष पदासाठी बिनविरोध निवडणूक पार पडली होती. यात अध्यक्षपदी अड. महेश कदम, सचिव अड. सोहेल पटेल तर कोषाध्यक्षपदी ज्ञानेश्वर वर्पे यांची बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्षपदासाठी दोन अर्ज आल्याने ही निवडणुक अत्यंत चुरशीची झाल्याने या कडे सर्वांचे लक्ष लागले होते. दोन्ही उमेदवारांनी आपापली प्रतिष्ठा पणाला लावली होती. वैजापूरच्या इतिहासात प्रथमता फक्त उपाध्यक्ष पदासाठी मतदान प्रक्रियेने निवडणूक झाली याकडे सर्व तालुक्याचे नव्हे तर जिल्ह्याचे लक्ष होते. दि .31 जानेवारी शुक्रवार रोजी न्यायालयाच्या आवारात असलेल्या वकील संघाच्या कार्यालयात दुपारी मतदान होऊन त्या नंतर मतमोजणी झाली त्यात उपाध्यक्ष पदासाठी अड. जावेद नवाब बेग यांना विजयी घोषित करण्यात आले. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून अड.एस. एस. ठोळे, अड. मेराज शेख, अड. दत्तात्रय जाधव यांनी काम पाहिले .

दैनिक युवक आधार (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# माझी शाळा,सुरक्षित शाळा व स्टूडंट ऑफ रोड सेफ्टी हे सक्षम नागरिक बनविणारे उपक्रम - ना.अदिती तटकरे

## सन्मान सोहळा कार्यक्रमात केले प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : महेंद्र माने** बालगंधर्व रंगभवन रिलायन्स टाऊनशिप येथे रायगड पोलीस आयोजित रस्ता सुरक्षा अभियान 2025 अंतर्गत शुक्रवार 31 जानेवारी रोजी सकाळी 11.00 वाजता मंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य ना.कु. आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती घेण्यात आलेल्या माझी शाळा, सुरक्षित शाळा व स्टूडंट ऑफ रोड सेफ्टी सन्मान सोहळा कार्यक्रमात माझी शाळा,सुरक्षित शाळा व स्टूडंट ऑफ रोड सेफ्टी हे सक्षम नागरिक बनविणारे उपक्रम असल्याचे प्रतिपादन ना.अदिती तटकरे यांनी केले.यावेळी रायगड पोलीस अधीक्षक, सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, रोहा उपविभागीय अधिकारी रविंद्र दौडकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते,सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी, रिलायन्स समुदायचे अनुप शुक्ला, योगेश परसुरे,रमेश धनावडे यांच्यासह भाई टके, शिवराम शिंदे,विलास चौलकर, उदय जवके,राजेंद्र धात्रक, राजेंद्र शिंदे, आनंद लाड, धनराज उमाळे,दिपेंद्र आवाद, बिपिन सोष्टे, हिराजी शिंदे, उल्हास शिंदे,नीलेश म्हात्रे तसेच जिल्ह्यातील पोलिस अधिकारी, शाळा मुख्यापक,शिक्षक, विद्यार्थी व




नागरिक उपस्थित होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना ना.अदिती तटकरे यांनी या स्पर्धेत रायगड पोलिसांनी शाळेतील विद्यार्थ्यांना सहभागी करीत वेगवेगळे कार्यक्रम राबविल्याने विद्यार्थ्यांमधून म्हणजेच पुढील पिढीला सक्षम नागरिक बनविणारा हा उपक्रम असल्याचे प्रतिपादन करीत पालकांना आपल्या पाल्याच्या सुरक्षीतेबाबत काळजी असल्याने त्यांना चांगल्या शाळेत टाकणे साहजिकच आहे. आपण एक महिन्याच्या कालावधीत जिल्ह्यातून साधारण 500 शाळांचे सर्वेक्षण करीत 28 सुरक्षित शाळांची निवड केलीत. तसेच ही योजना वाढवून पुढील 30 दिवसात इतर सर्व शाळांनाही पत्र देऊन या योजनेत सामील करून घ्या. हा उपक्रम आम्ही गृह विभाग व शालेय शिक्षण विभागात पोहचवून जेणे करून हा उपक्रम संपूर्ण राज्यातील शाळेत राबविता येईल.त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली की शाळा समिती मुलांसाठी अनुकूल वातावरण तयार करतील.असे उपक्रम राबविल्याने रायगड पोलिसांना सतत तीन वर्षे पुरस्कार मिळत असल्याने अभिनंदन. पुढील कालावधीत नागोठणे पोलिस ठाणे अधिक सक्षम करण्यासाठी काम करायचे असून रायगड पोलिस चांगले काम करीत आहेत. मुंबई गोवा महामार्गाचे काम तीन चार महिन्याच्या कालावधीत पूर्ण होणार आहे. त्यामुळे अधिकच्या भाराचा जो आपल्याला व नागरिकांना होणार त्रास कमी होणार असल्याचे सांगून पेण येथील आरटीओ कार्यालय असल्याने दक्षिण रायगडच्या नागरिकांना तिथ पर्यंत त्रास करीत प्रवास करावा लागतो त्यामुळे कार्यालयाचा माणगाव येथे विस्तार होणे



गरजेचे असल्याचे शेवटी ना. तटकरे यांनी सांगितले.आपल्या प्रस्तावनेत सोमनाथ घार्गे या उपक्रमात अनेक कार्यक्रम राबविले त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. या मागे जन जागृती करीत लोकांचा जीव वाचविणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. महेश देवकाते यांनी आरटीओच्या कामांची माहिती दिली. त्यामध्ये वाहन नोंदणी करणे,कागदपत्र व संबंधित कागद पत्र बाळगणे,परवाना देणे, रस्ता सुरक्षित ठेवणे तसेच आता ही कामे ऑन लाईन पद्धतीमुळे आपण घरी बसून करू शकणार असल्याचे सांगून नागरिकांनी नियम पाळले तर अपघात कमी होण्यास मदत होईल असे सांगितले. या कार्यक्रमात माझी शाळा,सुरक्षित शाळा स्पर्धेमध्ये निवड केलेल्या शाळांचा सन्मान तसेच शाळेत विविध स्पर्धेमध्ये विजेत्यांना बक्षीस वितरण, रस्ता सुरक्षा अभियान पथ नाट्य कलाकारांचा सन्मान, शाळेच्या उत्कृष्ठ चालक सन्मान तसेच उत्कृष्ट पोलिस पालकांचा सन्मान चिन्ह,प्रशस्ती पत्रक देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी रस्ता सुरक्षा प्रतिज्ञा घेण्यात आली.उपस्थितांचे आभार प्रदर्शन अभिजित शिवथरे यांनी केले.

## अब्दुल सत्तारांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्याचा आरोप, कटारिया, शंकरपेल्ली,ढाकरेविरूध्दचा गुन्हा खंडपीठाने केला रद्द.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः योगेश पालोदकर**
**सिल्लोडः-** आमदार अब्दुल सत्तार यांच्या विरुद्ध सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी सिल्लोड ते भाजपा शहराध्यक्ष कमलेश गोविंदराम कटारिया, सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरलाल शंकरपेल्ली व अमोल अशोक ठाकरे या तिघांविरुद्ध सिल्लोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. मात्र आरोप सिद्ध न झाल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी व न्या. संजय देशमुख यांनी तिघांविरुद्ध गुन्हा रद्द केला आहे. या प्रकरणात जिल्हा बँक अध्यक्ष अर्जुन बाबुराव गाडे यांनी सिल्लोड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती 12 फेब्रुवारी 2021 ला सिल्लोड नगर परिषदेविरुद्ध निघालेल्या निषेध मोर्चा दरम्यान आंबेडकर चौकात अब्दुल सत्तार यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप होता. त्यामुळे सत्तार यांची बदनामी झाली असे गाडे यांनी म्हटले होते. हा गुन्हा रद्द व्हावा यासाठी ड. अंगद कानडे यांच्यामार्फत कटारिया, शंकरपेल्ली व ढाकरे यांनी खंडपीठात फौजदारी अर्ज केला होता. प्रथम माहिती अहवाल आणि पक्ष कार्यकर्त्यांचे जबाब यावरून कटारिया यांनी नेमके कोणते आक्षेपार्ह वक्तव्य, कृत्य अथवा गाणी गायली व घोषणा दिल्या याचा तपशील दिला नाही. तथाकथित चित्रफीत तपास अधिकाऱ्यांनी हस्तगत केली नाही. त्यामुळे केवळ कार्यकर्त्यांच्या जबावाशिवाय दोषारोपपत्रात काहीही नाही.केवळ भादंवी कलम २९४ हे दखलपात्र कलम आहे,असे निरिक्षण खंडपीठाने नोंदवले. सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह वक्तव्य अथवा क्रत्य केल्याचे आणि त्यामुळे इतरांना उपद्रव झाल्याचे सरकार पक्षाने सिद्ध केले नाही. कलम ५०४ नुसार जाणून बुजून माजी मंत्र्यांचा अवमान करून शांततेचा भंग करून इतरांना प्रोत्साहन दिल्याचेही सिद्ध झाले नाही.






## महाराष्ट्र पोलीस बॉईजच्या प्रयत्नामुळे एक वर्षीय मुलाची शस्त्रक्रिया झाली यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
**उत्कर्ष साळवे** ( राहणार मु.पो. राशन, तालुका - कर्जत, जिल्हा - अहिल्या नगर) हा एक वर्षाचा मुलगा ह्याच्या छातीत गाठ असल्याचे डॉक्टरांनी निदान केले. तसेच कळविले की शस्त्रक्रिया करण्यासाठी जवळपास 6 लाखाचा खर्च येईल पण शस्त्रक्रिया यशस्वी होईलच याची गॅरंटी 99% नाही. अशी माहिती महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष (आरोग्य सेवा) प्रवीण भैलुमे यांना कळाली. लागलीच त्यांनी आपल्या संघटनेचे अध्यक्ष राहुल भैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रायगड जिल्हा अध्यक्ष किशोर जी वाजे यांच्याशी चर्चा करून सूत्रे हलवली आणि मुंबई येथील एसआरसीसी रुग्णालयात उत्तमरीत्या शस्त्रक्रिया मोफत करून घेतली. या तत्परतेबद्दल महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे सर्वच स्तरातून कौतूक होत आहे.



## सरपंच अहिल्या बाळाराम नाईक यांची जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) रायगड महिला प्रतिनिधी म्हणून नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : शिवसेना मावळचे लोकप्रिय खासदार उत्तम ससंद पटू श्रीरंग आप्पा बारणे यांच्या आशीर्वादाने सौ अहिल्या बाळाराम नाईक सरपंच यांचे केंद्र पुरस्कार योजना अंतर्गत कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) रायगड महिला प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले. यावेळी अहिल्या नाईक यांचे त्याचे शिवसेनेच्या वतीने व सर्व कार्यकर्त्यांच्या हार्दिक अभिनंदन केले. तसेच बाळाराम कृष्णा नाईक शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख ग्रामीण उरण विधानसभा क्षेत्र यांनी सांगितले की, खासदार श्रीरंग बारणे यांचा या नियुक्तीमध्ये सिंहाचा वाटा आहे.



## उपसरपंचपदी रेश्मा दीपक पाटील यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी**
ग्रुप ग्रामपंचायत उमरोलीच्या उपसरपंच पदी रेश्मा दीपक पाटील यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ग्रुप ग्रामपंचायत उमरोलीच्या उपसरपंच पदी रेश्मा दीपक पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे सरपंच, माजी सरपंच, माजी उपसरपंच, सदस्य, ग्रामस्थ, जय हनुमान क्रिकेट संघाकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.




## भागीरथी पंडित यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**
नाभिक समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते तसेच पत्रकार संजय पंडित यांच्या मातोश्री ह.भ.प. भागीरथीबाई राजाराम पंडित यांचे वयाच्या 90 व्या वर्षी सोमवार 27 जानेवारी रोजी वृद्धापकाळाने कळवा – ठाणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिववावर मनीषा नगर वैकुंठ भूमीत अंत्यसंस्कार करण्यात



आले. त्यांच्या पश्चात संजय पंडित हा मुलगा,सुनीता श्याम कदम ही विवाहित मुलगी तसेच सून,जावई व नातवंडे असा परिवार आहे. वारकरी सांप्रदायाच्या भागीरथीबाईंचे दशक्रिया विधी बुधवार 05 फेब्रुवारी रोजी कळवा येथील मनीषानगर वैकुंठ भूमीत तर उत्तरकार्य शनिवार 08 फेब्रुवारी रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती पंडित कुटुंबियांनी दिली.

# वारदोली येथील हळदीकुंकू समारंभ महिला सक्षमीकरणच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमाने संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**पनवेल रायगड**
गुरुवार दिनांक 30 जानेवारी 2025 रोजी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारदोली पनवेल येथे निपुण माता पालक गटांकरिता 'हळदीकुंकू समारंभ' ठेवण्यात आला.या समारंभाला एका आगळ्यावेगळ्या समारंभाचे रूप देण्यात आले. सदर समारंभ फक्त हळदी कुंकू उपक्रम महिलांच्या मनोरंजना पर्यंतच मर्यादित नव्हता. तर सदर उपक्रमाला महिलांच्या सक्षमीकरणाकरिता कार्य करणाऱ्या आदर्श अशा महिलांचे मार्गदर्शन लाभले होते. हे मार्गदर्शन मातांकरिता त्यांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाकरता ही उपयुक्त ठरणारे असे मार्गदर्शन होते.सदर कार्यक्रम जिल्हा परिषद वारदोली शाळेत घेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात आलेल्या मान्यवरांच्या शुभ हस्ते दीपक प्रज्वलन





आणि प्रतिमा पूजन करून करण्यात आले. त्याचबरोबर आलेल्या मान्यवरांचे स्वागत आणि निपुण माता गटांचे स्वागतही करण्यात आले. नंतर मान्यवरांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. त्या मार्गदर्शनामध्ये. आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी दैनंदिन जीवनात मुलांसोबत कसा संवाद साधावा, महिलांनी आपले आरोग्य कशाप्रकारे ठेवलं पाहिजे त्याचबरोबर विशेष म्हणजे आपल्या महिलांच्या शारीरिक आरोग्या बरोबरच मानसिक आरोग्य, मानसिक आजार, यावर चांगल्या प्रकारे मार्गदर्शनपर संवाद साधला.तसेच सदर कार्यक्रमात महिलांच्या मनोरंजनाकरिता काही खेळ ही घेण्यात आले आणि खेळात विजेत्या मातांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस ही वितरित करण्यात आले. हळदी कुंकू या समारंभाकरिता कार्यक्रमाला लाभलेल्या उत्कृष्ट अशा महिलांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रमुख पाहुण्यांमध्ये मान.प्रीती ताई म्हात्रे जॉर्ज मॅडम महाराष्ट्र राज्य महिला मध्यवर्ती समिती सदस्य व माजी नगरसेविका पनवेल महानगरपालिका,अनिशा कोल्हापुरे सायकॉलॉजीस्ट, रंजना केणी केंद्रप्रमुख केंद्र नेरे, संजय केणी केंद्रप्रमुख पोयंजे,जानवी बताले माजी उपसरपंच ग्रुप ग्रामपंचायत वारदोली,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य आशा भोपी,वर्षा म्हात्रे,धनश्री पाटील,प्रगती पाटील,लीडर माता, महिला पालक , शिक्षणप्रेमी उपस्थित होते. त्याचबरोबर सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारदोली येथील मुख्याध्यापिका अरुणा सूर्यवंशी आणि उपशिक्षिका ज्योती भोपी तसेच शाळा व्यवस्थापन समिती,शाळेतील सतत उत्स्फूर्त सहभागी असणारे विद्यार्थी, गावातील शिक्षण प्रेमी, या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाची सांगता शाळेच्या मुख्याध्यापिका अरुणा सूर्यवंशी मॅडम यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार व्यक्त करून करण्यात आली. त्याचबरोबर सदर हळदी कुंकू या कार्यक्रमाला एक आगळे वेगळे रूप दिल्याबद्दल गावकरी आणि शिक्षणप्रेमी, गावातील निपुण मातांनी शाळेचेही आभार व्यक्त करत. मोठ्या आनंदात आणि उत्साहात हळदीकुंकू कार्यक्रमाची सांगता झाली.

# नेहरू युवा केंद्राच्या वतीने मंगरूळपीर येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

## "नेहरू युवा मंडळ व राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा यांच्या आयोजन "

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंग ठाकूर**
**मंगरूळपीर ;** नेहरू युवा केंद्र व मेरा युवा भारत केंद्र वाशिम युवा कार्यक्रम खेल मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने मंगळगिरी ते तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे घेण्यात आल्या. या स्पर्धेचे आयोजन नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांच्या वतीने श्री.वसंतराव नाईक व अमरसिंग नाईक वरिष्ठ महाविद्यालय मंगरूळपीर येथे करण्यात आले होते. यामध्ये 15 ते 29 वयोगटातील युवक युती यांनी मोठा सहभाग या स्पर्धेमध्ये नोंदविला होता यामध्ये प्रथम द्वितीय तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना व सन्मानचिन्ह, मेडल सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




या स्पर्धेमध्ये मुलांकरिता 100 मीटर धावणे,गोळाफेक, कबड्डी मुलींकरिता 100 मीटर धावणे, गोळा फेक आणि खो.खो स्पर्धेचे घेण्याचा आली. यावेळी उपस्थित श्री.नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वडगुल्ले, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ अध्यक्ष जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त प्रदिप पट्टेबहदुर, क्रीडा शिक्षक प्रा. धारूरकर, राष्ट्रिय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. तायडे, नेहरू युवा केंद्र मा.स्वयंसेवक दत्ता मोहाळे, राजा प्रसेनजित संस्था प्रतिनिधी अंकुश पंडीत, युवा प्रशिक्षक कपिल देवकर यांची उपस्थिती होती.यावेळी उपस्थित स्पर्धकांना प्रदीप पट्टेबहादूर यांनी मार्गदर्शन करून उपस्थित विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. तालुकास्तरावर विजयी झालेले स्पर्धक हे जिल्हास्तरावर खेळण्यासाठी पात्र ठरले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.तायडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धारुडकर यांनी केले. सर्वांचे आभार दत्ता मोहळे यांनी मानले. एवढी आधी प्राध्यापक वर्ग व खेळाडू स्पर्धक विद्यार्थी यांचा मोठा सहभाग मिळाला. मंगरूळपीर ; नेहरू युवा केंद्र व मेरा युवा भारत केंद्र वाशिम युवा कार्यक्रम खेल मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने मंगळगिरी ते तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे घेण्यात आल्या. या स्पर्धेचे आयोजन नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांच्या वतीने श्री.वसंतराव नाईक व अमरसिंग नाईक वरिष्ठ महाविद्यालय मंगरूळपीर येथे करण्यात आले होते. यामध्ये 15 ते 29 वयोगटातील युवक युती यांनी मोठा सहभाग या स्पर्धेमध्ये नोंदविला होता यामध्ये प्रथम द्वितीय तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना व सन्मानचिन्ह, मेडल सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये मुलांकरिता 100 मीटर धावणे,गोळाफेक, कबड्डी मुलींकरिता 100 मीटर धावणे, गोळा फेक आणि खो.खो स्पर्धेचे घेण्याचा आली. यावेळी उपस्थित श्री.नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वडगुल्ले, नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ अध्यक्ष जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त प्रदिप पट्टेबहदुर, क्रीडा शिक्षक प्रा. धारूरकर, राष्ट्रिय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. तायडे, नेहरू युवा केंद्र मा.स्वयंसेवक दत्ता मोहाळे, राजा प्रसेनजित संस्था प्रतिनिधी अंकुश पंडीत, युवा प्रशिक्षक कपिल देवकर यांची उपस्थिती होती.यावेळी उपस्थित स्पर्धकांना प्रदीप पट्टेबहादूर यांनी मार्गदर्शन करून उपस्थित विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. तालुकास्तरावर विजयी झालेले स्पर्धक हे जिल्हास्तरावर खेळण्यासाठी पात्र ठरले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.तायडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धारुडकर यांनी केले. सर्वांचे आभार दत्ता मोहळे यांनी मानले. एवढी आधी प्राध्यापक वर्ग व खेळाडू स्पर्धक विद्यार्थी यांचा मोठा सहभाग मिळाला.

## हुतात्मा दिन आणि महात्मा गांधींच्या बलिदान दिनानिमित्त राज्यपालांची मणिभवनला भेट

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**
राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी यांच्या 77 व्या बलिदान दिनानिमित्त दि. 30 जानेवारी रोजी दक्षिण मुंबईतील महात्मा गांधी स्मारक असलेल्या 'मणिभवन'ला भेट दिली. १९१७ ते 1934 या काळात मणिभवन हे महात्मा गांधींचे मुंबईतील निवासस्थान होते. मणिभवनच्या इतिहासानुसार 1919मध्ये महात्मा गांधींनी सत्याग्रहाची आणि 1932 मध्ये सविनय कायदेभंग चळवळीची सुरुवात येथूनच केली होती. सुरुवातीला राज्यपालांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली आणि प्रार्थना सभेत सहभाग घेतला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींचे आवडते भजन 'रघुपती राघव राजाराम' गायले. त्यानंतर राज्यपालांनी मणिभवन संग्रहालयाला भेट देऊन महात्मा गांधी ज्या कक्षात वास्तव्याला असत त्या वास्तूला भेट दिली. या वेळी बोलताना राज्यपालांनी सर्वांना जात, पंथ आणि धर्म यांच्या संकीर्ण मतभेदापलीकडे जाण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या सत्य, अहिंसा आणि सदाचाराच्या विचारांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले, सन 1959 साली मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांनी आणि दैनिक2010 साली अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांनी मणिभवनला दिलेल्या भेट दिल्याची



माहिती मणिभवनच्या विश्वस्तांनी राज्यपालांना दिली.त्याच बरोबर हुतात्मा दिनानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी राज भवन येथे दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आपली आदरांजली वाहिली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी दरवर्षी 30 जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो.. या प्रसंगी मणिभवनच्या विश्वस्त व पदाधिकारी उषा ठक्कर, संध्या मेहता, योगेश कामदार, फाल्गुनी मेहता, रक्षा मेहता, मेघश्याम आजगांवकर आणि सजीव राजन उपस्थित होते.त्याच बरोबरीने राज्यपालांचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, राज्यपालांच्या सचिव श्वेता सिंघल, राजभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम खात्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी देखिल दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांचे स्मरण केले.



# सिद्धिविनायक मंदिराच्या कायापालटासाठी ५०० कोटी


## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती | क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मुंबईचा विकास

**मुंबई** : दादर येथील सिद्धिविनायक मंदिराचा कायापालट होणार असून यासाठी ५०० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. तसेच माहीम येथील रखडलेल्या म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास होणार आहे. खासगी विकासकांवर अवलंबून न राहता एमएमआरडीए, म्हाडा, सिडको व मुंबई महापालिका आदींच्या मदतीने क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून मुंबईचा विकास करण्यात येणार आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मी आम्ही तिघेही विकासासाठी पुढे आलो आहोत, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी सिद्धिविनायक मंदिर, माहीम मतदारसंघातील म्हाडाच्या इमारतींची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते.

मुंबईत म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास रखडला असून अनेक विकासक घर मालकाला भाडे न देता प्रकल्प अर्धवट सोडून गेले आहेत. प्रकल्प अर्धवट सोडून गेलेल्या विकासकांना काढून टाकणार आहे. सामान्यांना परवडणारे व प्रशस्त असे घर देण्यासाठी वेळ पडल्यास नियम, कायद्यात बदल करावयाचा असल्यास तेही करण्यात येईल. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळाच्या समोर असे निर्णय आणले जातील. रखडलेल्या पुनर्विकासाच्या कामांना सामूहिक पुनर्विकासाच्या माध्यमातून गती देण्यात येईल. ठाण्यातही अशा पद्धतीने सामूहिक पुनर्विकास योजना सुरू झालेली आहे. सामूहिक पुनर्विकास योजना राबविताना येत असलेल्या अडचणी दूर करण्यात येतील, असेही शिंदे म्हणाले.

एसआरए, म्हाडा, एमआयडीसी, एमएमआरडीए, सिडको व बीएमसी या सर्व यंत्रणांच्या समन्वयाने सामूहिक पुनर्विकासाची योजना राबविण्यात येईल. या सामूहिक पुनर्विकासाच्या माध्यमातून प्राथमिक सोयी सुविधांची उपलब्धता करून देण्यात येईल. यामध्ये बगीचा, आरोग्याच्या सुविधा, खुले मैदान आदींचा समावेश असेल. शासन लवकरच गृहनिर्माण धोरण आणत आहे. यामध्ये म्हाडाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, काम करणाऱ्या महिला, गिरणी कामगार, पोलीस, गावठाण कोळीवाडा यांच्यासाठी घरांची उपलब्धता आणि परवडणारी घरे, परवडणारी भाड्याची घरे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असणार आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी गुरुवारी सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले. त्यानंतर प्रभादेवी येथील सहा समूह पुनर्विकास प्रकल्पांची पाहणी केली. पाहणीनंतर दादर, माहिम व प्रभादेवी विभागातील प्रलंबित पुनर्विकास संदर्भात आढावा कार्यक्रम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. व्यासपीठावर श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासचे अध्यक्ष सदा सरवणकर, उपाध्यक्ष जैस्वाल, एसआरएचे मिलिंद शंभरकर, कल्याणकर आदींसह लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



### उद्धव ठाकरे यांना अप्रत्यक्ष टोला

मुख्यमंत्री असताना गेल्या अडीच वर्षांत मुंबईचा विकास झपाट्याने होत असून आताही मुंबईचा विकास थांबणार नाही. बाबासाहेबांचे विचार घेऊन पुढे निघालो आहोत. त्यामुळे मुंबईचा विकास होत असताना मी कधीही श्रेयासाठी पुढे पुढे केले नाही. मात्र काहीजण घरात बसून श्रेय घेण्यासाठी धडपडत आहेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेने कौल दिला तो महायुतीच्या कामांकडे पाहून. श्रेयासाठी घरात बसून काम होत नाही. विधानसभा निवडणुकीत जनतेने एडिट केले आणि डिलीट केले. त्यामुळे कसले क्रेडिट घेताय, असा टोला एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला.

# सत्ताधाऱ्यांतच आरोप-प्रत्यारोपाची शर्यत

**मुंबई** : राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची जणू शर्यतच सुरू आहे. बीड प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या उत्तरातून स्पष्ट झाले की, निष्णात वकिलामार्फत आरोपीला वाचवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्याप्रमाणे सध्या मुख्यमंत्री बोलत आहेत. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडत नसल्याने राज्य पेटले आहे, असा हल्लाबोल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपद सांभाळावे, असा खोचक टोला पटोले यांनी फडणवीस यांना यावेळी लगावला. दरम्यान, पीकविम्यात घोटाळा झाल्याचे समोर येत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार गप्प का?, असा सवाल पटोले यांनी उपस्थित केला आहे.

सरकारमध्ये परिस्थिती भयावह आहे. सरकारला लाडक्या बहिणीची चिंता नाही. २४ लाख विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी अर्ज केले आहेत. त्यातील लाखो बहिणींना सरकार नोकरी देऊ शकत नाही. लाडक्या बहिणींचे पती शेतकरीही

### नाना पटोले यांचा हल्लाबोल



आहेत आणि हा शेतकरी दररोज आत्महत्या करत आहे, असे पटोले म्हणाले.

सोयाबिनला ६ हजार रुपयांचा भाव देणार असे बोलले होते. पण ३ हजारांचा भाव मिळत नाही. धान, कांदा, कापसाची स्थितीही अशीच आहे. भावांतर योजना लागू करून फरक देण्याचे आश्वासन दिले होते, त्याचे काय झाले. सरकार फक्त जनतेला लुटण्यासाठी सत्तेत आले आहे. भाजप युती सरकारमध्ये ६५ टक्के मंत्री कलंकीत आहेत. दररोज महाराष्ट्राची प्रतिमा खराब केली जात आहे. बीड जिल्ह्यातील भ्रष्टाचाराची प्रकरणे दररोज उघड होत असून पुण्यासह इतर जिल्ह्यांतही तीच स्थिती असल्याचे पटोले म्हणाले.

सत्ताधारी पक्षाचे आमदार भ्रष्टाचार झाल्याचे उघड सांगत आहेत. मागील अडीच वर्षांपासून हेच सुरू आहे. शेतकऱ्यांच्या योजनेत ४ टक्के भ्रष्टाचार होतो हे मंत्र्यांनीच सांगितले, असेही पटोले म्हणाले.

### अजित पवार खोटे बोलताहेत

सत्ताधारी पक्षाचा आमदार पीक विमा योजनेत भ्रष्टाचार झाल्याचे सांगतोय. कृषिमंत्र्यांनीही भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले. पीकविमा घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने भ्रष्टाचार झाल्याचे सांगितले असताना उपमुख्यमंत्री अजित पवार जर घोटाळा झालाच नाही असे म्हणत असतील, तर ते धादांत खोटे बोलत आहेत. त्यांनी खोटे बोलू नये, कशासाठी ते खोटे बोलत आहेत असा प्रश्न विचारून अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू व शेतकऱ्याच्या विधवा पत्नीच्या कपाळावरचे कुंकू विसरू नये, असे पटोले म्हणाले.

# डी. के. रावच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी होणार

**मुंबई** : गँगस्टर छोटा राजनचा निकटवर्तीय डी. के. राव याच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी मुंबई गुन्हे शाखा करणार आहे. त्याच्यावर एका हॉटेल खंडणी प्रकरणात मध्यस्थी करण्यासाठी इतर आरोपींकडून पैसे स्वीकारल्याचा आरोप आहे. तसेच, अटक करण्यात आलेला आरोपी अबूबकर सिद्दीकीच्या मोबाईलमध्ये आढळून आलेले व्हॉट्सॲप व्हॉईस नोट्स तपासले जात असून डी. के. राव आणि इतर आरोपींचे आवाज नमुने फॉरेन्सिक विश्लेषणासाठी घेतले जाणार आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाला पुष्टी दिली आहे.

गुन्हे शाखेने २३ जानेवारी रोजी डी. के. राव (५३), अबूबकर अब्दुल्ला सिद्दीकी (३७), इमरान कलीम शेख (३१), रियाज कलीम शेख (४०), आसिफ सत्तान खान ऊर्फ सैफ दरबार (३६), जावेद जलालुद्दीन खान (३५) आणि हनीफ इस्माईल नाईक ऊर्फ अण्णू भाई (५३) यांना अटक केली. त्यांच्यावर ७४ वर्षीय हॉटेल व्यावसायिकाकडून २.५ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे.

# मुंडे यांच्याबाबतचा निर्णय अजित पवार घेतील

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य



**मुंबई** : बीड सरपंच हत्या प्रकरणावरून वादाच्या भोवऱ्यात सापडलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबतचा निर्णय अजित पवार घेतील असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी या प्रकरणाचा चेंडू उपमुख्यमंत्र्यांच्या कोर्टात टाकला.

दिल्लीतील एका सभेनंतर फडणवीस यांनी हे वक्तव्य केले. याआधी काही तासांपूर्वी अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांनी त्यांची भेट घेतली होती.

धनंजय मुंडे आणि माझी मंत्रिमंडळ बैठकीच्या वेळी सकाळी भेट झाली. ते आमच्या सरकारमधील मंत्री आहेत आणि आमच्या भेटीत काहीही गुपित नाही. ते मला केव्हाही भेटू शकतात आणि मी त्यांना केव्हाही भेटू शकतो, असे फडणवीस यांनी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितले.

अजित पवार यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरील भूमिकेबाबत वक्तव्य केले आहे. अजित पवार जी भूमिका घेतील ती अंतिम असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

डिसेंबरमध्ये बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्या अटकेनंतर मुंडे हे अडचणीत आले आहेत.

### जातीय सलोखा रॅली



महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी जुहू येथे काढण्यात आलेल्या शांतता आणि जातीय सलोखा रॅलीत एसएनडीटी विद्यापीठातील ७०० एनएसएस स्वयंसेवक, गांधीवादी कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. (छाया : विजय गोहिल)

### वंचित मुलींचे लसीकरण

**मुंबई** : राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त, मुंबईतील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. बकुल पारेख यांनी शहरातील दुर्बल पार्श्वभूमीतील मुलींचे कांजण्या प्रतिबंधात्मक लसीकरण केले. वेरिसेला विषाणूमुळे होणारा कांजण्यांचा आजार संसर्गजन्य असून शरीरावर खाजरे फोड उठतात. या विषाणूमुळे गर्भधारणे दरम्यान गंभीर गुंतागुंत होऊन आई व नवजात बाळासाठी प्राणघातक ठरते.

डॉ. बकुल पारेख म्हणाले की, कांजण्यांवरील लस सुरक्षित आणि अत्यंत प्रभावी असून मुलांमध्ये होणाऱ्या या गंभीर आजाराला रोखण्यासाठी ही लस उपयुक्त आहे. हा कार्यक्रम भारतातील सार्वजनिक आरोग्य उपक्रमांसाठी एक आदर्श नमुना तयार करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# तुरुंगात टाकू सांगणाऱ्यांनी ‘त्यांना’ मंत्रिमंडळात घेतले

## राज ठाकरे यांचा भाजपला टोला

**मुंबई** : ज्या पक्षाने एकेकाळी हजारो कोटींच्या आर्थिक घोटाळ्यात सामील असलेल्या नेत्यांना तुरुंगात टाकले जाईल असे म्हटले होते, त्याच नेत्यांना राज्य मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतले, असा टोला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी भाजपला लगावला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सभेत बोलताना ठाकरे यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालावरही शंका व्यक्त केली. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी) ने लोकसभा निवडणुकीत फक्त एक जागा जिंकल्यानंतर, काही महिन्यांतच विधानसभेच्या निवडणुकीत ४२ जागा कशा जिंकल्या? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

ठाकरे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते की



७०,००० कोटींच्या घोटाळ्यात सामील असलेल्या लोकांना तुरुंगात टाकले जाईल. पण त्यांना कुठे टाकले? मंत्रिमंडळात.

भाजपने एकेकाळी अनेक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, नंतर त्याच नेत्यांसोबत हात मिळवून त्यांना मुख्यमंत्री आणि मंत्री केले, असे ठाकरे म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रात सर्वाधिक जागा जिंकल्या. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील एनसीपीने ८ जागा जिंकल्या होत्या. पण त्यांनी विधानसभेत फक्त १० जागा जिंकल्या, असे ठाकरे म्हणाले.

# डेपोमधून वाहकांना सुट्ट्या पैशांचा पुरवठा करा

## एसटी महामंडळाचे निर्देश

**मुंबई** : एसटी प्रवासादरम्यान प्रवासी व वाहक यांच्यात सुट्ट्या पैशांवरून वाद होऊ लागले आहेत. प्रवाशांसोबतचे वाद टाळण्यासाठी महामंडळाने यूपीआयच्या माध्यमातून ऑनलाइन पेमेंटची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. या सेवेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. यासोबतच महामंडळाने बस वाहकांना डेपोमधून सुट्ट्या पैशांचा पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे वाहक आणि प्रवाशांमधील वादावर पडदा पडण्याची शक्यता आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने यूपीआय पेमेंटची सेवा उपलब्ध करून दिली आहे. भाडेवाढ झाल्यापासून या सेवेला प्रवाशांकडून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. दैनंदिन यूपीआय पेमेंट दुपटीने वाढले आहे. या बरोबरच महामंडळाने एक परिपत्रक काढून वाहकांना ड्युटीवर जाताना डेपोमधून सुट्ट्या पैशांचा पुरवठा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे वाहक व प्रवासी यांच्यामध्ये सुट्ट्या पैशांवरून होणारे वाद टळतील, असा विश्वास महामंडळाने व्यक्त केला आहे.



### भाडेवाढ सूत्रात बदलासाठी फेर प्रस्ताव पाठवावा

एसटीच्या नव्या भाडेवाढीमुळे प्रवासी व वाहक यांच्यात सुट्ट्या पैशांवरून दररोज बाचाबाची होऊ लागली आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर आगारातील नांदेड बुद्रुक या मार्गावर कामगिरी बजावणाऱ्या वाहकाला मारहाण झाल्याचा गुन्हा पोलिसांत दाखल करण्यात आला आहे. भाडेवाढ झाल्यानंतर पाच दिवसांत अनेक ठिकाणी वाद झाल्याच्या घटना समोर आल्या असून खबरदारी म्हणून भाडेवाढ सूत्रात तत्काळ बदल करण्यासाठी एसटीकडून पुन्हा एकदा राज्य परिवहन प्राधिकरणाकडे फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे. नवीन भाडेवाढ ही पाच रुपयांच्या पटीत असावी, असा स्पष्ट प्रस्ताव एसटीने यापूर्वीच पाठवला होता. यानंतरही प्राधिकरणाने एक रुपयाच्या पटीत भाडेवाढ करण्याचा आदेश काढला असून सध्या चलनात सुट्ट्या पैशांचे व्यवहार जवळ जवळ बंद झाले आहेत, असेही बरगे म्हणाले.

# घाटकोपर दुर्घटनेतील आरोपीची अडचण वाढणार?

## जान्हवीच्या जामिनाला सरकारचे हायकोर्टात आव्हान

**मुंबई** : घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतील मुख्य आरोपींपैकी एक असलेली इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेडची माजी संचालिका जान्हवी मराठेचा जामीन अर्ज रद्द करा, अशी मागणी करीत राज्य सरकारने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. जान्हवी मराठेला डिसेंबर महिन्यात सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. त्या जामिनाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. याप्रकरणी १४ फेब्रुवारीला सुनावणी निश्चित करण्यात आली आहे.

घाटकोपरमध्ये गेल्या वर्षी मे महिन्यात महाकाय होर्डिंग कोसळले. त्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला, तर ७० हून अधिक जण जखमी झाले होते. दुर्घटनेला कारणीभूत ठरलेले होर्डिंग उभारणाऱ्या इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या माजी संचालिका जान्हवी मराठेचा अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर जान्हवीला ८ जून रोजी गोव्यातील



हॉटेलमधून अटक करण्यात आली होती. तिने डिसेंबर २०२३ मध्ये कंपनीचा राजीनामा दिल्याचा दावा केला होता. त्यामुळे आपल्याला जबाबदार धरले जाऊ शकत नाही, असा दावा केला होता. मात्र नंतर या प्रकरणातील सहआरोपी भावेश भिंडे याला सत्र न्यायालयाने जामीन दिला. त्यामुळे आपल्यालाही समानतेच्या तत्त्वावर जामीन द्या, अशी याचना जान्हवीने केली होती. अखेर डिसेंबर महिन्यात सत्र न्यायालयाने तिला जामीन मंजूर केला. त्या निर्णयाला राज्य सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. सरकारच्या अर्जाची न्या. मिलिंद जाधव यांनी दखल घेतली आणि १४ फेब्रुवारी रोजी सुनावणी निश्चित केली. त्यामुळे जान्हवी मराठेच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

# राणी बागेतील मत्स्यालयाची निविदा रद्द करा

## सपा आमदार रईस शेख यांची मागणी

**मुंबई** : भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती व उद्यान प्राणी संग्रहालयात मत्स्यालयासाठी मागवण्यात आलेली निविदा रद्द करा, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी पालिका आयुक्तांना पत्राद्वारे केली आहे. तसेच एकच निविदाकार सहभागी असल्याचा दावा करत ढिसाळ नियोजन करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा, असे शेख यांनी पत्रात नमूद केले आहे.

मत्स्यालयासाठी राखीव ठेवलेले एकूण क्षेत्रफळ फक्त पाच हजार चौरस फूट आहे, ज्याची उंची २० फुटांपेक्षा कमी आहे. तरीही पालिका प्रशासन या प्रकल्पासाठी ६५ कोटी रुपये खर्च करत आहे. मर्यादित जागेत हे जगातील सर्वात महागडे मत्स्यालय ठरेल, असे रईस शेख यांनी पत्रात नमूद केले आहे.

प्रस्तावित मत्स्यालय पेंग्विन एन्क्लोजरच्या अगदी समोर आहे, जिथे दररोज मोठ्या संख्येने पर्यटक येतात. त्यामुळे सुरक्षिततेच्या समस्या उद्‌भवू शकतात, असे शेख म्हणाले.

### उच्च न्यायालयाकडून बंदी कायम

# माघी गणेशोत्सवात पीओपीच्या गणेशमूर्तींना मनाई

**मुंबई** : सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) बनवलेल्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याबरोबरच त्यांचे विसर्जन करण्यास घातलेली बंदी उच्च न्यायालयाने कायम ठेवली. मुख्य न्या. अलोक आराधे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करा, असे आदेश राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांना दिले.

ठाण्यातील पर्यावरणवादी कार्यकर्ते रोहित जोशी व इतर १२ जणांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यात ९ पारंपरिक मूर्तिकार व ३ पर्यावरणवादी कार्यकर्ते यांचा समोवश आहे. या जनहित याचिकेवर मुख्य न्या. अलोक आराधे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी मूर्तिकारांच्या संघटनेने १ फेब्रवारी रोजी माघी गणेशोत्सवासाठी आधीच पीओपीच्या गणेशमूर्तींची विक्री



झाली असल्याचे न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. तसेच शाडूच्या मूर्तीमुळे पर्यावरणीय समस्या अधिक निर्माण होत असल्याचे शास्त्रोक्तदृष्ट्या स्पष्ट झाल्याचा दावा करून पीओपीच्या गणेशमूर्तींना परवानगी द्यावी, अशी विनंती केली. याचिकाकर्ते रोहित जोशी यांच्या वतीने वकील रोनिता भट्टाचार्य यांनी याला जोरदार आक्षेप घेतला. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात पार पडलेल्या गणेशोत्सवाच्या वेळी न्यायालयाने पीओपीच्या गणेशमूर्तींना बंदी घातली. त्यावेळी सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन केले जाईल, अशी हमी यंत्रणांनी दिली होती. असे असताना माघी गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात पीओपीच्या मूर्ती तयार करून त्या विकल्या जात असल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. याची गंभीर दखल खंडपीठाने घेत सीपीसीबीची मार्गदर्शक तत्त्वे अंमलात असताना मूर्तिकार पीओपीच्या मूर्ती का तयार करतात, असा प्रश्न उपस्थित केला.

### पुढील सुनावणी २० मार्चला

प्रत्येकवेळी मूर्तिकारांकडून उपजीविकेचा प्रश्न उपस्थित केला जात असल्याची टिप्पणी करून खंडपीठाने सीपीसीबीच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यापासून अंतरिम दिलासा देऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले. तसेच मूर्तिकारांचे जे काही म्हणणे असेल ते ऐकले जाईल, असे स्पष्ट करून न्यायालयाने त्यावरील सुनावणी २० मार्च रोजी ठेवली.